Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# चंद्रपूर जिल्हयातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या समस्या व आव्हाने

**रोशन देवराव मुरतेली**
संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग,
श्री ज्ञानेश महाविद्यालय, नवरगांव
ई.मेल. roshanmurteli7@gmail.com

---

***गोषवारा :***

*श्रम हे उत्पादन निर्मिती कार्यातील सर्वात महत्वाचा घटक आहे श्रमिकांच्य शारीरिक व बौध्दिक श्रमाचा योग्य वापर होण्यासाठी अर्थव्यवस्थेतील संघटित क्षेत्रापेक्षा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या जास्त आहे असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची सध्या परिस्थिती अत्यंत हलाखीचे व दैनिय आहे. तसेच या क्षेत्रातील श्रमिकांचे असंघटित संघटन तसेच शासनाकडे नोंदणीकृत नसतात त्यांच्यावर कोणाचेही नियंत्रण राहत नाही त्यामुळे श्रमिकांच्या न्याय हक्काबद्दल अन्याय होतांना दिसुन येते. श्रमिकांच्या कामाचे तास व मजुरी कमी असल्यामुळे सर्व बाबी अनिश्चित असतात त्यामुळे श्रमिकांच्या जीवनमानात मोठे प्रभाव पडलेले दिसून येते या क्षेत्रातील श्रमिकांच्या जीवनावर सामाजिक आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे आणि सामाजिक दर्जा कमी घेतांना दिसून येत आहे.*

*चंद्रपूर जिल्हयातील असंघटित क्षेत्रात काम करण्याची संख्या जास्त असल्यामुळे श्रमिकांच्या जीवनमानावर परिणाम झालेला दिसून येत आहे. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना येणाऱ्या समस्या व आव्हाना समोर जावे लागत आहे, चंद्रपूर जिल्हयामध्ये वाढत चालेली बेरोजगारी ही असंघटित क्षेत्रासमोरील मोठे आव्हान आहे,*

**सुचक शब्द** : श्रमिक, कामगार, संघटित, असंघटित, शेतमजुर, मजुरी, रोजगार, बेरोजगार, हंगामी, ग्रामीण.

---

**प्रस्तावना :**

उत्पादन, निर्मिती प्रक्रियेतील एक महत्वाचा अंग म्हणजे श्रम होय. श्रम हे घटक शारीरिक व बौध्दिक स्वरूपाचे आहे. शारीरिक श्रम हे अंग मेहनतीचे आहे तर बौध्दिक श्रम हे बौद्धिक कौशल्याचे आहे. तसेच श्रम हे उत्पादन प्रक्रियेतील सक्रिय घटक असून श्रमा शिवाय उत्पादन प्रक्रिया निर्माण होवू शकत नाही. तसेच श्रमिकांच्या कार्यकुशलतेवर श्रमिकांच्या शारीरिक व बौध्दिक स्वरूपाचे कार्य अवलंबून आहे. उपजिविका भागविण्यासाठी पैशाच्या किंवा वस्तुंच्या मोबदल्यात जी व्यक्ती काम करते त्या व्यक्तिला श्रमिक म्हणतात श्रमिक हे शारीरिक व बौध्दिक काम करणारे असतात.

श्रमिकांच्या काम करण्याच्या क्षेत्रानुसार श्रमिकांचे वर्गीकरण करण्यात येतात. श्रमिकांचे संघटित व असंघटित असे दोन क्षेत्रात वर्गीकरण करण्यात येते. संघटित क्षेत्र हे सरकारकडे नोंदणीकृत केले जाते. तसेच त्यांची मार्गदर्शक तत्वे आणि नियमांचे पालन केले जाते व श्रमिकांचे संघटन कार्य असते संघटित क्षेत्रात श्रमिक हे. अधिक कार्यक्षम व कामाचे तास तसेच मजुरी निश्चित असते. याउलट असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांचे सरकारकडे नोंदणीकृत नाही. श्रमिकांवर कोणाचेही नियंत्रण राहत नाही तसेच मार्गदर्शक

तत्वांचे आणि नियमांचे पालन करत नाही हे श्रमिक कमी कार्यक्षम असतात. संघटित व असंघटित क्षेत्रात मोठ्य प्रमाणात तफावत दिसून येते. संघटित क्षेत्रात श्रमिकांवर नियंत्रण असते तर असंघटित क्षेत्रावर कोणाचे नियंत्रण राहत नाही. संघटित क्षेत्रात मजुरी ठरविली जाते व असंघटित क्षेत्रात कमी मजूरी असते. संघटित क्षेत्रात कामाचे तास निश्चित असतात. तर असंघटित क्षेत्रात तास अनेकदा अनियमित असतात. संघटित क्षेत्रात नौकरीची सुरक्षितता असते. तर असंघटित क्षेत्रात नौकरीची किंवा कामाची सुरक्षितता नसते. संघटित व असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांना मिळणाऱ्या विविध प्रकारची सुरक्षितता वेगवेगळी आहे.

चंद्रपूर जिल्हयामध्ये असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची संख्या दिवसेंदिवस वाढ होतांना दिसून येत आहे. जिल्हयामध्ये काम करणाऱ्या श्रमिकांची मुख्य व. सिमांतिक श्रमिकांची लोकसंख्या १०,५८,१७० आहे (२०११ च्या जनगणनेनुसार) संघटित क्षेत्रात काम करणाऱ्याची लोकसंख्या ३२.३० टक्के आहे. तसेच असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची लोकसंख्येच्या ६८.०० टक्के आहे. जिल्हयात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याची लोकसंख्या वाढत चालली आहे. श्रमिकांना रोजगार निर्मितीच्या संधीची उणिव भासत आहे. तसेच श्रमिकांना वाढती लोकसंख्या अज्ञान, सुरक्षितता, शिक्षणाचा अभाव, हंगामी स्वरूपाचे काम, श्रमिकांच्या संघटनेचा अभाव अशा विविध समस्या जिल्हयामध्ये दिसून येत आहे. जिल्हयामध्ये श्रमिकांसमोर वाढती लोकसंख्या, बेराजगारी ठेकेदारी पध्दत, नवीन तांत्रिक कौशल्य, रोजगार निर्मितीच्या पर्यायाचा अभाव, आधूनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर हे आव्हान जिल्हयामध्ये असंघटित क्षेत्रात दिसून येत आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या समस्येचा चिकित्सक अध्ययन करणे.
२. श्रमिकांच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.
३. उत्पादन वाढीसाठी श्रमिकांची भूमिका तपासणे.
४. असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची मानव विकासाची स्थिती तपासणे.

**गृहितके :**

१. श्रमिक असंघटित आहे.
२. शेतमजुरांच्या जीवनमानाचा दर्जा खालावलेला आहे.
३. हंगामीस्वरूपी कामाची निश्चियता नाही
४. शेतमजुरासमोर अनेक आर्थिक समस्या आहे.

**संशोधन पध्दती :**

वरील संशोधनासाठी द्वितीय साधनांचा अधिक प्रमाणात वापर करण्यात आले व काही प्रमाणात प्रत्यक्ष असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना भेटून निरिक्षण, व सर्वेक्षण या पध्दतीने केल आहे. संशोधनाच्या संदर्भात असलेल्या विविध लेखकांनी लेखन केलेल्या शोधप्रबंधाचे आधार घेवून तसेच इंटरनेटच्या माध्यमातून घेतले आहे.

**संशोधनाची मर्यादा :**

वरील संशोधन चंद्रपूर जिल्ह्यातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या समस्या व त्यांच्यासमोरील आव्हाने या विषया पुरतीच मर्यादित आहे.

**विषय विवेचन :**

असंघटित क्षेत्र हे श्रमिकांच्या न्याय हक्कासाठी व सामाजिक प्रश्न, सोठविण्यासाठी कधीही एकत्रित न येवू शकणारे समुह होय. असंघटित क्षेत्रात, काम करणाऱ्या श्रमिकांचे सरकारकडे नोंदणीकृत नसतात, तसेच या क्षेत्रातील श्रमिकांवर कोणाचे ही नियंत्रण राहत नाही. श्रमिकांच्या कामाचे तास तसेच कमी मजुरी अनियमीत असतात व सामाजिक आर्थिक सुरक्षितता नसते, असंघटित क्षेत्रात श्रमिकांचे संघटन अभावी त्यांच्या आर्थिक जीवनमानावर प्रभाव पडलेला दिसून येते.

**पहिली राष्ट्रीय श्रम आयोगाने (१९६६–६८) :**

'असंघटित कामगार' ही संकल्पना स्पष्ट करतांना म्हटले आहे की, ज्यांना रोजगाराचे तात्पुरते स्वरूप अज्ञान आणि निरक्षरता व्यवसाय किंवा कामाचे विस्कळीत व लहान स्वरूप कामाच्या स्वरूपामुळे मालकवर्गाकडे एकवटलेल्या शक्ती अशासारख्या समस्यामुळे सामुदायिक उद्दिष्टये प्राप्त करण्यात अडचणी येतात व ते संघटित होऊ शकत नाही अशा कामगारांचा उल्लेख असंघटित कामगार म्हणून करता येईल.

**असंघटित श्रमिकांचे वर्गीकरण :**

**अ) व्यवसायानुसार :**

शेतकरी, शेतमजूर, अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजुर, विणकाम करणारे, बांधकामगार, विटा व दगडखाणीत कामे करणारे इत्यादी

**ब) रोजगाराच्या स्वरुपानुसार :**

हंगामी स्वरूपाचे काम करणारे, स्थलांतरित कामगार, बांधील शेतकामगार, वेठबिगार, कंत्राटी इत्यादी कामे करणारे.

**क) विशेष आपत्तिग्रस्त स्वरूपाचे कामगार :**

हमाल, सफाई कामगार, जनावरांच्या गाड्य हाकणारे इत्यादी कामे करणारे.

**ड) सेवा प्रकारातील स्वरूपाचे कामगार :**

वर्तमानपत्र विक्रेते, घरकाम करणारे, भाज्या व फळविक्रेते इत्यादी कामे करणारे.

**असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची वैशिष्टये :**

१. श्रमिक निरक्षर असतात
२. श्रमिकांचे संघटनाचा अभाव असतो

३. श्रमिकांना मिळणारे उत्पन्न कमी असते.
४. न्याय हक्कासाठी संघर्ष करू शकत नाही
५. श्रमिकांवर कोणाचेही नियंत्रण नसते.
६. श्रमिकांची काम करण्याची जागा सुरक्षित नसते.
७. श्रमिकांमध्ये शिक्षणाचा अभाव असतो.
८. श्रमिकांच्या कामांचे तास अधिक असते तसेच मजुरी कमी असते.
९. श्रमिकांना हंगामी स्वरूपाचे काम असते.

**चंद्रपूर जिल्हयातील संघटित व असंघटित क्षेत्रातील श्रमिक**

| अ.क्र | क्षेत्र | लोकसंख्या लाखात | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | एकुण लोकसंख्या (महाराष्ट्र : जिल्हा) | २२,०४,३०७ | १.९६ |
| २ | श्रमिकांची एकुण लोकसंख्या | १०,५८,१७० | ४८.०० |
| ३ | संघटित क्षेत्र | ३४१८६५ | ३२.०० |
| ४ | असंघटित क्षेत्र | ७१६३०५ | ६८.०० |
| | शेतकरी | २२०९७८ | २०.९० |
| | शेतमजुर | ४७३९८३ | ४४.८० |
| | वस्तुनिर्माण सेवा दुरूस्त्या व घरगुती उद्योग. | २१३४४ | २.०० |
| | **एकुण श्रमिक संख्या** | **१०,५८,१७०** | **१००.००** |

**आधार : सामाजिक व आर्थिक समालोचन. चंद्रपूर (जनगणना २०११)**

चंद्रपूर जिल्हयातील श्रमिकांची संख्या लक्षात घेता. चंद्रपूर जिल्हयाची एकूण लोकसंख्या २२,०४,३०७ असून ती महाराष्ट्र राज्याच्या १.९६ एवढी आहे. जिल्हयात काम करणाऱ्या मुख्य व सिमांतिक श्रमिकांच्यी लोकसंख्या एकूण लोकसंख्येपैकी १०,५८,१७० असून ४८ टक्के आहे जिल्हयातील श्रमिकांचे संघटित तसेच असंघटित क्षेत्रात श्रमिकांचे वर्गीकरण करण्यात येते. संघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची एकूण लोकसंख्या ३,४१,८६५ असून ती एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी ३२.०० टक्के आहे. तसेच असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांची एकूण लोकसंख्या ७,१६,३०५ असून ती एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येपैकी ६८ टक्के आहे. असंघटित क्षेत्रात श्रमिकाची संख्या जास्त दिसून येत आहे. २०.९० टक्के शेतकरी ४४.८० टक्के शेतमजूर तसेच वस्तूनिर्माण, सेवा दुरुस्त्या व घरगुती उद्योगामध्ये २.०० टक्के काम करतांना दिसून येते. चंद्रपूर जिल्हयात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्याची संख्या जास्त असल्या कारणाने असंघटित क्षेत्रात वाढत चालेली लोकसंख्या आणि वाढती बेरोजगारी या समस्या चंद्रपूर जिल्हयात दिसून येते, चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण भागात लोकसंख्या अधिक प्रमाण असल्या कारणांने चंद्रपूर जिल्हा असंघटित क्षेत्राचा प्रभाव वाढला दिसून येते.

**चंद्रपूर जिल्हयातील असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच समस्या :**

चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण लोकसंख्या ६५ टक्के तर शहरी लोकसंख्या

३५ टक्के आहे. जिल्हयाची लोकसंख्या ग्रामीण भागात अधिक असल्या कारणाने ग्रामिण भागात हंगामी स्वरूपाचे काम अधिक आढळून येते तसेच श्रमिकांच्या समुह किंवा संघटनांचा अभाव दिसून येते, श्रमिकांना मिळणारी मजुरी कमी आहे. कामाचे तास अधिक तसेच श्रमिकांवर कोणाचेही नियंत्रण दिसून येत नाही. श्रमिकामध्ये शिक्षणाचा अभाव तसेच अज्ञान या कारणांने श्रमिकांना हंगामीस्वरूपी काम करावे लागत आहे. चंद्रपूर जिल्हा हे ग्रामिण असल्याकारणाने औद्योगिकीकरणाचा अभाव, रोजगार निर्मितीची साधने उपलब्ध नाही आणि शासनाचे या जिल्हयाकडे पाहण्याचा दृष्टीकोण या सर्व बाबी पाहता चंद्रपूर जिल्हयामध्ये श्रमिकांना समस्या आहे. असंघटित क्षेत्रात वाढत चालेली लोकसंख्या त्यामुळे निर्मिण झालेली बेरोजगारी ही असंघटित क्षेत्रात निर्माण झालेली समस्या श्रमिकांना हंगामी स्वरूपी काम करण्यास भाग पाडत आहे.

१. वाढती लोकसंख्या
२. वाढती बेरोजगारी
३. आधुनिक तंत्राचा वाढता वापर
४. श्रमिकांचे अज्ञान
५. ठेकेदारी पध्दत

**उपाय :**

१. चंद्रपूर जिल्हयात जवळपास ६८.०० टक्के श्रमिक वर्ग असंघटित क्षेत्रात काम करता आहे तर त्यांना कायद्यांचे सरंक्षण मिळणे आवश्यक आहे.
२. सरकारने एक गाव दत्तक घेवून श्रमिकांना सुरक्षित करणे गरजेचे आहे.
३. शैक्षणिक शिबिरे व प्रशिक्षणे आयोजित करणे.
४. असंघटित श्रमिकांच्या कामांचे तास व मजुरी ठरवून घावे
५. सरकारने ग्रामीण विकासाठी योजना आखणे.
६. रोजगार निर्मिती संबंधीत आवश्यक उपक्रम राबविणे.

**निष्कर्ष :**

१. चंद्रपूर जिल्ल्यात कृषी क्षेत्रात असंघटित श्रमिकांचे अस्तित्व अधिक आढळते
२. चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण क्षेत्रातील श्रमिक असंघटित आहे.
३. चंद्रपूर जिल्हयात शिक्षणाचा अभाव, श्रमिक संघटनाचा अभाव, गरिबी असे वास्तविक चित्र दिसले.
४. चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण क्षेत्रात रोजगार निर्मितीच्या संधी कमी प्रमाणात आहे

**संदर्भ ग्रंथ सुंची :**


- डॉ प्रभाकर देशमुख, 'श्रमाचे अर्थशास्त्र' विद्या प्रकाशण नागपूर.
- डॉ. सतिश शिरसाठ, 'असंघटित कामगार' पौढ निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग पूणे विद्यापीठ.
- डॉ. सुधीर बोधनकर 'श्रमाचे अर्थशास्त्र' श्री साईनाथ प्रकाशन नागपूर
- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन चंद्रपुर २०२२
- अर्थमीमांसा – भारतीय सौर शके १९४३ (जानेवार जून २०२२ / खंड १४ अंक)

- Nationcel seminar and State level Seminar &8th March 2011&Gondia Education society's, s-s Girls college Department of Hindi and Economic
- The Indian Economic Journal &Journal of the Indian- Economic Association- Special issue 2015 December